दिनांक ०१.०८.२०२५ रोजी मानमोडी, ता. तुळजापूर येथे जिल्हा परिषद शाळेस भेट व पाहणी






दिनांक ०१.०८.२०२५ रोजी मुरटा मानमोडी, ता. तुळजापूर येथे चारा लागवडीचे ठिकाणास भेट व चारा लागवडीचे शुभारंभ कार्यक्रमास उपस्थित






दिनांक ०४.०८.२०२५ रोजी उपायुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता विभाग यांचे समवेत रोजगार मेळावा आयोजीत करण्याबाबत बैठक व चर्चा



दिनांक ०६.०८.२०२५ रोजी बावनबीर, ता. संग्रामपुर, जि. बुलढाणा येथे मृतक रवीन्द्र अकोटकर शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





दैनिक हसरी दुनिया

# ॲड. निलेश हेलोडे पाटील (राज्यमंत्री दर्जा ) यांची संग्रामपुर तालुक्यातील चारा लागवडची पाहणी



हसरी दुनिया / संग्रामपुर

कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा ) अँड निलेश हेलोडे पाटील यांची संग्रामपुर तालुक्यातील चारा लागवडची पाहणी करुन आत्महत्या ग्रस्त कुटुंबांच्या घरी सात्वन पर भेट दिली.

तालुक्यातील बावनबीर येथील २८ वर्षीय युवा शेतकरी सुमित रवींद्र अकोटकार यांनी निर्सगाची अकृपा त्यात शेती बरोबर पिकत नसल्याने सतत आर्थिक अडचण भासत असल्याने युवा शेतकरीने हतबल नैराश्य पोटी दि २८ मार्च २०२४ रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आत्महत्याग्रस्त कुटुंबीच्या घरी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन (म राज्य ) अध्यक्ष अँड निलेश हेलोडे पाटील सात्वंतर भेट देऊन आस्थेने विचार पुस करुन दिलासा दिला.

यावेळी भेटीदरम्यान जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वे मृतकाचे कुटुंब पत्नी प्रगती सुमित अकोटकार व मुलगा सर्वेश सुमित आकोटकर यांना एक लाख रुपायाची आर्थिक मदतीचा धनादेश सुपुर्त केला गटविकास अधिकारी माधव पायघन, नायब तहसीलदार शिंदे , बावनबीर ग्रा पं सरपंच गजानन मनसुटे, उपसरपंच शेख नजीर शेख कदीर, ग्रा पं सदस्य, ग्रा पं कर्मचारी उपस्थित होते.

संग्रामपूर तालुक्यामध्ये दूध क्रांती घडून येण्यासाठी तसेच जनावरांना मुबलक चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात चारा लागवड करण्याच्या सूचना निर्देश अध्यक्ष अँड निलेश हेलोडे पाटील यांनी तहसीलदार प्रशांत पाटील, गटविकास अधिकारी माधव पायघन यांना दिले.

त्यानुसार संग्रामपुर पंचायत समिती अंतर्गत मग्रारोहयो विभाग मार्फत पातुर्डा बु ग्रा पं येथे चारा लागवड करण्यात आलेली होती सदर चारा लागवडीला राज्यमंत्री दर्जा अध्यक्ष अँड. निलेश हेलोडे पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली अशाच प्रकारचा उपक्रम मोठ्या प्रमाणात संग्रामपूर तालुक्यामध्ये राबविण्याकरता निर्देश दिलेले आहे तसेच गायरान जमिनीवर जास्तीत जास्त चारा लागवड कशी करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी गटविकास अधिकारी माधव पायघन ,नायब तहसीलदार विकास शिंदे , रोजगार हमी योजना विभागाचे कर्मचारी नितीन तायडे विजयसिंह परिहार , पातुर्डा ग्रा पं सरपंच रणजीत गंगतीरे, ग्रामविकास अधिकारी मारोडे , ग्रामसेवक ओमप्रकाश रहाटे , तालुका पशुधन अधिकारी डॉ पटेल , तलाठी तांबट , ग्रा पं सदस्य निलेश चांडक, सिद्धार्थ गाळे , चारा लागवड लाभार्थी निखिल रहाटे सह सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

# शेतकऱ्यांनी शेतीसोबत दुग्ध व शेतीपुरक व्यवसायाला चालना द्यावी : अ‍ॅड.हेलोडे पाटील

**बुलढाणा, ८ ऑगस्ट (गुड इव्हिनिंग सिटी)** : विदर्भातील शेतकरी बांधव व सुशिक्षित बेरोजगार युवकांनी पारंपरिक पिकांसोबत दुग्ध व्यवसाय, रेशीम उद्योग आणि ग्रामपंचायत सार्वजनिक जमिनीवर चारा उत्पादन करून कुटुंबाच्या उत्पन्नात भर घालावी, असे आवाहन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) अ‍ॅड. निलेश हेलोडे पाटील यांनी केले.



अ‍ॅड. निलेश हेलोडे पाटील हे दि.६ ऑगस्ट रोजी बुलढाणा जिल्हा दौऱ्यावर होते. यावेळी कृषि, ग्रामविकास, पशुसंवर्धन व महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांशी चर्चा करून पुरक व्यवसाय वाढवून शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवणे, बेरोजगारी कमी करणे आणि शेतकरी आत्महत्या रोखण्यासाठी चालू असलेल्या योजनांचा आढावा घेतला. त्यानंतर अ‍ॅड. हेलोडे पाटील यांनी संग्रामपूर तालुक्यातील बावनबिर, पातुर्डा आणि शेगाव तालुक्यातील पहुरपूर्णा व कठोरा गावांना भेट दिली. बावनबिर येथील आत्महत्या केलेल्या शेतकरी कै. सुमीत रविंद्र आकोटकर व पहुरपूर्णा येथील कै. दत्तात्रय रामेश्वर उमाळे यांच्या कुटुंबीयांना त्यांनी भेटून सांत्वन केले. आणि शासनाच्या योजनांद्वारे तातडीने मदत मिळवून देण्याचे आश्वासन दिले. पातुर्डा येथे ज्वारी चारा लागवड, तर कठोरा येथे ग्रामपंचायत गट क्र. ७६ व ७७ वर सिताफळ, बांबू, लिंबू लागवड आणि पडीक जमिनीवरील नियोजित चारा प्रकल्पाची पाहणी करण्यात आली. ग्रामस्थांना मग्रारोहयो अंतर्गत चारा लागवड करून पशुपालकांना मोफत चारा वाटप करण्याचे आवाहन त्यांनी केले. शेतकऱ्यांनी केवळ नगदी पिकांवर अवलंबून न राहता तुती लागवड करून रेशीम उद्योग, तसेच दुग्ध व्यवसाय सुरू करून उत्पन्नाचे विविध स्रोत निर्माण करावेत. विदर्भात पश्चिम महाराष्ट्रासारखे प्रत्येक शेतकऱ्याच्या घरी दुग्ध व्यवसाय सुरू झाला पाहिजे, तेव्हाच आत्महत्या थांबतील आणि गावांचा सर्वांगीण विकास होईल, असे त्यांनी स्पष्ट केले. यावेळी बावनबिर गावचे सरपंच गजानन मनसुटे, पातुर्डा, पहुरपूर्णा व कठोरा गावांचे सरपंच, संबंधित तालुक्यांचे तहसीलदार, कृषि अधिकारी, गटविकास अधिकारी, ग्रामपंचायत सदस्य, शासकीय अधिकारी व मोठ्या संख्येने ग्रामस्थ उपस्थित होते.

# दैनिक जनआधार



# कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन अध्यक्ष अ‍ॅड निलेश हेलोडे पाटील (राज्यमंत्री दर्जा ) यांची संग्रामपुर तालुक्यातील चारा लागवडची पाहणी , आत्महत्या ग्रस्त कुटुंबांची सात्वन पर भेट

संग्रामपुर - कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्य अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा ) अ‍ॅड निलेश हेलोडे पाटील यांची संग्रामपुर तालुक्यातील चारा लागवडची पाहणी करून आत्महत्या ग्रस्त कुटुंबांच्या घरी सात्वन पर भेट दिली तालुक्यातील बावनबीर येथील २८ वर्षीय युवा शेतकरी सुमित रवींद्र अकोटकार यांनी निसर्गाची अकृपा त्यात शेती बरोबर पिकत नसल्याने सतत आर्थिक अडचण भासत असल्याने युवा शेतकरीने हतबल नैराश्य पोटी दि 28 मार्च 2024 रोजी राहत्या घरात गळफास घेऊन आत्महत्या केली आत्महत्याग्रस्त कुटुंबीच्या घरी कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन (म राज्य ) अध्यक्ष अड निलेश हेलोडे पाटील सात्वंतर भेट देऊन आस्थेने विचार पुस करून दिलासा दिला. त्यावेळी भेटीदरम्यान जिल्हाधिकारी यांचे आदेशान्वे मृतकाचे कुटुंब पत्नी प्रगती सुमित अकोटकार व मुलगा सर्वेश सुमित आकोटकर यांना एक लाख रुपायाची आर्थिक मदतीचा धनादेश सुपूर्त केला गटविकास अधिकारी माधव पायघन, नायब



तहसीलदार शिंदे , बावनबीर ग्रा पं सरपंच गजानन मनसुटे, उपसरपंच शेख नजीर शेख कदीर, ग्रा पं सदस्य, ग्रा पं कर्मचारी उपस्थित होते.

संग्रामपूर तालुक्यामध्ये दूध क्रांती घडून येण्यासाठी तसेच जनावरांना मुबलक चारा उपलब्ध होण्याच्या दृष्टीने मोठ्या प्रमाणात चारा लागवड करण्याच्या सूचना निर्देश अध्यक्ष अ‍ॅड निलेश हेलोडे पाटील यांनी तहसीलदार प्रशांत पाटील, गटविकास अधिकारी माधव पायघन यांना दिले. त्यानुसार संग्रामपुर पंचायत समिती अंतर्गत मग्रारोहयो विभाग मार्फत पातुर्डा बु ग्रा पं येथे चारा लागवड करण्यात आलेली होती सदर चारा लागवडीला राज्यमंत्री दर्जा अध्यक्ष अ‍ॅड निलेश हेलोडे पाटील यांनी भेट देऊन पाहणी केली अशाच प्रकारचा उपक्रम मोठ्या प्रमाणात संग्रामपूर तालुक्यामध्ये राबविण्याकरता निर्देश दिलेले आहे तसेच गायरान जमिनीवर जास्तीत जास्त चारा लागवड कशी करता येईल याबाबत मार्गदर्शन केले. यावेळी प्रमोद कापडे जनसंपर्क अधिकारी कै वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन म.राज्य अमरावती , गटविकास अधिकारी माधव पायघन ,नायब तहसीलदार विकास शिंदे , रोजगार हमी योजना विभागाचे कर्मचारी नितीन तायडे विजयसिंह परिहार , पातुर्डा ग्रा पं सरपंच रणजीत गंगतरि, ग्रामविकास अधिकारी मारोडे , ग्रामसेवक ओमप्रकाश रहाटे , तालुका पशुधन अधिकारी डॉ पटेल , तलाठी तांबट , ग्रा पं सदस्य निलेश चांडक, सिद्धार्थ गाळे , चारा लागवड लाभार्थी निखिल रहाटे सह सर्व विभागाचे कर्मचारी उपस्थित होते

**दिनांक ०६.०८.२०२५ रोजी मौजे पातुर्डा, ता. संग्रामपुर, जि. बुलढाणा येथे श्री. निखिल रामकृष्ण रहाटे यांचे शेतातील वैयक्तीक चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी**





दिनांक ०६.०८.२०२५ रोजी पहूरपूर्णा ता. शेगांव, जि. बुलढाणा येथे मृतक दत्ता रामेश्वर उमाले शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट





दिनांक ०६.०८.२०२५ रोजी पहूरपूर्णा ता. शेगांव, जि. बुलढाणा येथील महिलांचे समस्यांबाबत निवेदन स्विकारताना



**दिनांक ०६.०८.२०२५ रोजी मौजे कठोरा, ता. शेगांव, जि. बुलढाणा येथे प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी**



**दिनांक ०७.०८.२०२५ रोजी मौजे सातरगांव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी**



# चारा लागवडीने स्वावलंबनाचा मार्ग खुला: हेलोंडे

## स्वावलंबी मिशन अध्यक्षांची चारा लागवड शेतीला भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**बाळापूर :** शेतकऱ्यांनी रोजगार हमी योजनेच्या माध्यमातून गुरांच्या चारा लागवड करून खर्चात बचत साधत दुग्धोत्पादनात वाढ करावी, असे आवाहन वसंतराव नाईक शेती स्वावलंबी मिशन, महाराष्ट्र राज्याचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ॲड. नीलेश हेलोंडे यांनी केले.

ॲड. हेलोंडे यांनी ग्राम सातरगाव येथील रोजगार हमी योजनेंतर्गत केलेल्या चारा लागवडीच्या शेताला भेट दिली. यावेळी त्यांनी सांगितले की, अशा पद्धतीच्या उपक्रमातून होणाऱ्या उत्पन्नामुळे शेतकरी स्वावलंबी होऊ शकतात. त्यांनी पुढे ग्राम कान्हेरी (गवळी) येथील आत्महत्याग्रस्त शेतकरी गोपाल साबळे यांच्या कुटुंबाची भेट घेऊन, त्यांना शासनाच्या योजनांचा आधार देऊन स्वयंरोजगार उपलब्ध करून देण्याच्या सूचना प्रशासनाला दिल्या. यावेळी तहसीलदार वैभव फरतारे, तालुका कृषी अधिकारी सागर डोंगरे, पंचायत समितीचे गटविकास अधिकारी बी. पी. पजई, नायब तहसीलदार डॉ. सागर भागवत, तसेच स्थानिक शेतकरी उपस्थित होते.

**दिनांक ०७.०८.२०२५ रोजी मौजे सातरगांव, ता. बाळापूर, जि. अकोला येथे चारा लागवडीचे प्रस्तावित नविन ठिकाणी आयोजीत कार्यक्रमास उपस्थित**



**दौरा** | एड. नीलेश हेलोंडे पाटिल ने आत्महत्या पीड़ित परिवार से की मुलाकात

# चारे की खेती से किसानों का खर्च बचेगा व आय बढ़ेगी : एड. नीलेश हेलोंडे

**दिपक रौंदळे तालुका प्रतिनिधी**

संवाददाता | बालापुर



वसंतराव नाइक कृषि आत्मनिर्भरता मिशन महाराष्ट्र राज्य, एड. नीलेश हेलोंडे पाटिल, अध्यक्ष (राज्य मंत्री रैंक) ने अपने अकोला जिला दौरे के दौरान शुक्रवार 7 अगस्त को सातरगांव, बालापुर में महाराष्ट्र रोजगार गारंटी योजना के तहत चारा खेती स्थल का दौरा किया और चारा खेती स्थल का निरीक्षण किया और सभी को निर्देश दिया कि वे प्रयास करें कि तहसील में इस तरह के चारे की खेती की जाए। इससे किसानों का खर्च बचेगा और आय में वृद्धि होगी। तदनुसार, उन्होंने ग्राम पंचायत, रोजगार सेवक और रोजगार गारंटी योजना के सभी तंत्रों के प्रयासों की सराहना की।

उसके बाद उन्होंने बालापुर जिले के कान्हेरी गवली में आत्महत्या करने वाले किसान गोपाल साबले के परिवार से मुलाकात की। अध्यक्ष ने सभी सरकारी एजेंसियों को आत्महत्या पीड़ित परिवार को सरकारी योजना का लाभ प्रदान करने और उन्हें आत्मनिर्भर बनने के लिए रोजगार प्रदान करने के निर्देश दिए।

एड. नीलेश हेलोंडे पाटिल के दौरे के दौरान बालापुर तहसीलदार वैभव फरतारे, बालापुर पजई के समूह विकास अधिकारी, तहसील कृषि अधिकारी सागर डोंगरे, महिला एवं बाल विकास अधिकारी भारती लांडे, आयुक्त पशुपालन अधिकारी, राजस्व विभाग के उप तहसीलदार, पटवारी, मंडल अधिकारी, ग्राम राजस्व एवं ग्राम विकास अधिकारी, पंचायत समिति के कर्मचारी, कृषि विभाग के कर्मचारी और स्वास्थ्य विभाग के कर्मचारी उपस्थित थे। साथ ही पुलिस का कड़ा बदोबस्त था।

## किसान लाभ उठाएं

मैंने रोजगार गारंटी योजना के तहत चारा उगाया व 100 क्विंटल चारा प्राप्त किया और इससे मेरे 20 हजार रुपये के खर्च की बचत हुई। चूंकि यह योजना बहुत लाभदायक है, इसलिए ज्यादा से ज्यादा किसानों को इसका लाभ उठाना चाहिए।
**- जयदेव तुकाराम पांडे,** किसान सातारगांव

## योजना का लाभ उठाएं

अकोला जिले के बालापुर स्थित सातरगांव में रोजगार गारंटी योजना के तहत चारा उत्पादन से किसानों को लाभ हुआ है और लागत में बचत हुई है। इसलिए अधिक से अधिक किसानों को इस सरकारी योजना का लाभ उठाना चाहिए और दूध उत्पादन बढ़ाने के प्रयास करने चाहिए।
**नीलेश हेलोंडे पाटिल,** अध्यक्ष, वसंतराव नाइक कृषि आत्मनिर्भरता मिशन महाराष्ट्र राज्य



दैनिक भास्कर
Sun, 10 August 2025
https://epaper.bhaskarhindi.com/c/77934231

**दिनांक ०७.०८.२०२५ रोजी कान्हेरी गवली, ता. बाळापूर, जि. अकोला येथे मृतक गोपाल शेषराव साबळे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटुंबियास भेट**





दिनांक ०७.०८.२०२५ रोजी पातुर तालुक्यातील तुलंगा,पिंपलखुटा,चतारी गावाचे सरपंच याना तुलंगा येथे किमान कौशल्य विकास योजनेचे स्कैनर देताना मा. अध्यक्ष महोदय





**दिनांक ०७.०८.२०२५ रोजी तुलंगा, ता. पातूर जि. अकोला येथील जिल्हा परिषदचे शाळेस भेट, पाहणी व वृक्ष लागवड करतांना मा. अध्यक्ष महोदय**






दिनांक ०७.०८.२०२५ रोजी तुलंगा, ता. पातूर जि. अकोला येथे श्री. प्रणव बालू तायड़े पाटिल यांचे घरी गावक-यांशी चारा लागवडी बाबत बैठक व चर्चा



दिनांक ०७.०८.२०२५ रोजी बेलूरा, ता. पातुर जि. अकोला येथे मृतक निलेश आनंदा दुतोंड शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट



दिनांक ०७.०८.२०२५ रोजी बेलूरा, ता. पातुर, जि. अकोला येथील सरपंच यांना कीमान कौशल्य विकास अंतर्गत रोजगार स्कैनर देताना मा. अध्यक्ष महोदय



दिनांक ०७.०८.२०२५ रोजी बाभुळगांव, ता. पातुर, जि. अकोला येथे प्रस्तावित चारा लागवडीचे ठिकाणास भेट





दिनांक ०७.०८.२०२५ रोजी पातुर, जि. अकोला येथे सावित्रीबाई फूले विद्यालयामध्ये आयोजीत जात प्रमाणपत्र कार्यक्रमास उपस्थित





दिनांक ०७.०८.२०२५ रोजी पातुर, जि. अकोला येथे किमान कौशल्य विकास कार्यक्रम चे स्कैनर पातुर तालुक्यातील सर्व ग्रामपंचायतींना प्रसिद्ध करने साठी देताना मा. अध्यक्ष महोदय



दिनांक ०७.०८.२०२५ रोजी पातुर, जि. अकोला येथे प्राचार्य ढोने सावित्रीबाई फूले विद्यालयाचे प्राचार्य श्री. ढोणे याना किमान कौश्यल विकास स्केनर देताना मा. अध्यक्ष महोदय



**दिनांक ०७.०८.२०२५ रोजी भंडारज, ता. पातुर, जि. अकोला येथे मृतक उमेश साहेबराव सुरवाड़े शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट**



**दिनांक ०७.०८.२०२५ रोजी नांदखेडा, ता. पातुर, जि. अकोला येथे मृतक श्रीकृष्ण आकाराम पांडे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियांची भेट**





दिनांक ०७.०८.२०२५ रोजी नांदखेड़ा, ता. पातुर, जि. अकोला येथे महसूल सप्ताह समारोप कार्यक्रम अतिक्रमण धारक कुटुंब याना नियमकुल पट्टे वाटप कार्यक्रमास उपस्थित



दिनांक ०७.०८.२०२५ रोजी नांदखेड़ा, ता. पातुर, जि. अकोला येथे महसूल सप्ताह समारोप कार्यक्रमामध्ये किमान कौशल्य विकास कार्यक्रम अंतर्गत स्कैनर सरपंच व ग्रामसेवक याना देताना मा. अध्यक्ष महोदय



**दिनांक १०.०८.२०२५ रोजी तहसिलदार, माहूर, जि. नांदेड यांचेसमवेत शासकीय गायरान जमीनीवर चारा लागवड करण्यासंदर्भात बैठक व चर्चा**



दिनांक १२.०८.२०२५ रोजी मौजे अल्लीपूर, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथेशासकीय गायरान जमीनीवर चारा लागवड शुभारंभ कार्यक्रमास उपस्थित





दिनांक १२.०८.२०२५ रोजी आजनसरा, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथे मृतक विजय देवराव कोपरकर शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट






**दिनांक १२.०८.२०२५ रोजी सोनेगांव धोटे, ता. हिंगणघाट, जि. वर्धा येथे मृतक संदीप कृष्णा बोभाटे शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट**






देशोन्नती

# निलेश हेलोंडे पाटील यांनी शेतकरी आत्महत्या झालेल्या कुटुंबांच्या घरी दिली सांत्वनपर भेट



देशोन्नती वृत्तसंकलन

**हिंगणघाट** : कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष निलेश हेलोंडे पाटील यांची हिंगणघाट तालुक्यातील शेतकरी आत्महत्या झालेल्या कुटुंबांना सांत्वनपर भेट दिली तसेच शासकीय जागेवर चारा लागवडी करिता निवड केलेल्या प्रकल्पस्थळाची पाहणी केली. प्रथम त्यांनी मौजा सोनेगाव धोटे येथील बोभाटे कुटुंबीयांना भेट दिली. यावेळी शीतल संदीप बोभाटे, पुत्र शौर्य संदीप बोभाटे व कन्या गायत्री संदीप बोभाटे यांच्याशी संवाद साधून शासनाच्या विविध शेतकरी सहाय्य योजनांची माहिती दिली. यावेळी आत्महत्याग्रस्तकुटुंबीय यांनी शासनाच्या विविध विभागाच्यामार्फत मिळत असलेल्या लाभ जसे की, भाजीपाला मिनिकीट, कृषि निविष्ठा, संजय गांधी योजना व इतर लाभाविषयक माहिती दिली. तसेच त्यांनी रोजगार निर्मिती करिता बचत गटाच्या मार्फत मिरची कांडप यंत्र अनुदानावर उपलब्ध करून देण्याची विनंती अध्यक्ष यांना केली. त्याबाबत तात्काळ कार्यवाही करण्याची सूचना उपस्थित अधिकारी यांना दिल्या. त्यानंतर मौजा आजनसरा येथील कोपरकर कुटुंबीयांना भेट देऊन संगीता विजय कोपरकर यांच्यासोबत संवाद साधला व शेतकरी कल्याणकारी योजनांची माहिती दिली. त्यांच्या समस्या समजून घेतल्या व त्याबाबत कार्यवाही करण्याच्या सूचना उपस्थित अधिकारी यांना दिल्या. त्यानंतर अध्यक्ष यांनी शासकीय जागेवर चारा लागवडीकरिता निश्चित केलेल्या स्थळाची पाहणी केली व उपस्थित अधिकारी यांना शासकीय योजनेमधून सदर जागेवर चारा लागवड करणे विषयक कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या. सदर भेटीच्या वेळी डॉ. महेश बहेकर, गट विकास अधिकारी, हिंगणघाट , सचिन सुतार, तालुका कृषि अधिकारी, हिंगणघाट, महिला व बालविकास अधिकारी, हिंगणघाट अमोल चिरूटकर, डॉ. मंदार मराठे, पशुधन विकास अधिकारी, हिंगणघाट जोगे, प्रशासक अल्लीपूर ग्रामपंचायत यावेळी उपस्थित होते.

दिनांक १२.०८.२०२५ रोजी विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती येथे मा. ना. श्री. दादाजी भुसे साहेब, शालेय शिक्षण मंत्री यांना चारा लागवडी संदर्भात मिशनचा अहवाल सादर तसेच चर्चा



**दिनांक १८.०८.२०२५ रोजी नबिरा महाविद्यालय, काटोल येथे पदवी पूर्ण करीत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शेतीकरीता जैविक निविष्ठा तयार करण्यासंदर्भात माहिती तसेच कौशल्य विकास प्रशिक्षणयोजनांची माहीती देण्यासंबंधी कार्यक्रमास उपस्थित**






दिनांक १८.०८.२०२५ रोजी श्री. पंढरीनाथ कला व वाणिज्य महाविद्यालय, नरखेड येथे शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांसाठी शेतीकरीता जैविक निविष्ठा तयार करण्यासंदर्भात माहिती तसेच कौशल्य विकास प्रशिक्षणयोजनांची माहीती देण्यासंबंधी कार्यक्रमास उपस्थित






देशोन्नती

# पंढरीनाथ महाविद्यालयात जैविक निविष्ठा कार्यशाळा संपन्न

देशोन्नती वृत्तसंकलन

**नरखेड** : कै वसंतराव वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन, कौशल्य विकास प्रशिक्षण योजना, श्री पंढरीनाथ कला वाणिज्य महाविद्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने महाविद्यालयाच्या स्व. रमेशबाबू गुप्ता सभागृहात जैविक निविष्ठा तयार करण्याबाबत एक दिवसीय कार्यशाळेत शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यशाळेचे उद्‌घाटन कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे यांच्या हस्ते झाले. अध्यक्षस्थानी डॉ. जयंत जवंजाळ होते. अतिथी म्हणून तहसीलदार उमेश खोडके, गटविकास अधिकारी रामदास गुंजकर, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विजय राऊत, फॉर्म लॅब कोळंबीचे राजेश मोहोरिया, अध्यापक विद्यालयाचे प्राचार्य राजेश महंत, रोजगार अधिकारी नागपूर दिग्विजय जामदार, आत्म्याचे निलेश रिथोरकर, पुरुषोत्तम धोटे, अजय बालपांडे यांची प्रामुख्याने उपस्थिती होती.

उद्‌घाटक ॲड. निलेश हेलोंडे यांनी शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाबरोबर जैविक तंत्रज्ञानाचा उपयोग कसा करावा याबाबत माहिती दिली. रोजगार अधिकारी दिग्विजय जामदार यांनी ड्रोनद्वारे फवारणी, जैविक शेती, सेंद्रिय शेती, रोजगार योजना, कै प्रमोद महाजन विकास योजना शेती विषयक नवीन नवीन योजनांची माहिती दिली, फॉर्म लॅब कोळंबीचे राजेश मोहरिया यांनी विविध स्थानिक साहित्याचा उपयोग करून अल्प खर्चात निविष्ठा कशी तयार करायची, शेतीसाठी उपयोगी स्लरी तयार करणे, विविध बुरशीनाशक तयार करणे याबाबतची प्रयोगानिशी विविध माहिती सांगितली. रोजगार अधिकारी दिग्विजय जामदार यांनी तहसीलदार उमेश खोडके व उपस्थितांच्या हस्ते शेती विषयक माहितीच्या क्यू आर कोड प्रसारित करण्यात आला. ज्याच्या माध्यमातून शेती विषयक विविध योजना, रोजगाराच्या योजना याची माहिती विद्यार्थ्यांना मिळणार आहे. संचालन प्रा. अमन गायधणे यांनी केले. आभार डॉ. पवन महंत यांनी मानले. प्राध्यापक, शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी, विद्यार्थी उपस्थित होते. कार्यशाळेच्या यशस्वीतेसाठी डॉ. रवी सोरते, डॉ. सतीश चंदेल, प्रा. प्रशांत डाखोळे, प्रा. राम फुले, प्रा. आशिष घाटोले, प्रा. अक्षय पुनवटकर, प्रा. दिलीप दातीर, प्रा. शिरीष खोबे, प्रा. हरीश धरत, प्रा. अशोक मदणकर, डॉ. सतीश चंदेल, प्रा. चेतन भिसे, विवेक बालपांडे प्रा. नेहा धर्मे, मनोज गायधने यांनी परिश्रम घेतले.

Nagpur Edition
Aug 20, 2025 Page No. 6
Powered by: erelego.com

दिनांक १८.०८.२०२५ रोजी खंडाळा ग्रामपंचायत खंडाळा, ता. नरखेड येथे तहसिलदार, गटविकास अधिकारी, पशुधन विकास अधिकारी (सर्व नरखेड) यांचे समेवत चारा लागवडीसंदर्भात बैठक व चर्चा






**दिनांक २०.०८.२०२५ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, छत्रपती संभाजीनगर येथील मिशनचे कार्यालयास भेट व पाहणी**





**दिनांक २०.०८.२०२५ रोजी बीड येथे कृषी उत्पन्न बाजार समितीतील रेशीम कोष खरेदी विक्री बाजारपेठेस भेट व पाहणी**






दिनांक २०.०८.२०२५ रोजी बीड येथे रेशीम उत्पादक शेतकरी यांचा सत्कार कार्यक्रमास उपस्थित



दिनांक २०.०८.२०२५ रोजी मौजे पाली, ता. जि. बीड येथे गायरान जमीनीवर चारा लागवडीचे शुभारंभ कार्यक्रमास उपस्थित



दिनांक २०.०८.२०२५ रोजी मौजे पाली, ता. जि. बीड येथे पशुपालक शेतकरी यांचा सत्कार कार्यक्रमास उपस्थित



दिनांक २०.०८.२०२५ रोजी मौजे पाली, ता. जि. बीड येथे कौशल्य विकास प्रशिक्षण योजनेसंबंधी स्कॅनर वाटप



**दिनांक २०.०८.२०२५ रोजी मौजे पाली, ता. जि. बीड येथे शेतकरी यांचेसमवेत स्नेहभोजन कार्यक्रमास उपस्थित**




# पाली येथील चारा लागवडीची ॲड.निलेश हेलोंडे-पाटील यांच्याकडून पाहणी

बीड, दि.२० (जिमाका): दुष्काळी परिस्थितीमध्ये ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना विविध अडचणींचा सामना करावा लागत असून, पशुधनासाठी पुरेसा चारा उपलब्ध करून देण्यासाठी मिशनच्या माध्यमातून राबविण्यात येत असलेल्या पाली येथील चारा लागवडीच्या उपक्रमाला कै. वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशनचे अध्यक्ष ड. निलेश हेलोंडे पाटील यांनी प्रत्यक्ष भेट देऊन पाहणी करत समाधान व्यक्त केले.



यावेळी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी श्री. थोरात, गट विकास अधिकारी श्री. राठोड, ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्यासह महसूल मंडळ अधिकारी पाली, श्रीमती चाटे, ग्राम महसुल अधिकारी अनिल गायकवाड, ग्रामसेवक शंकर वाघमारे तसेच ग्रामस्थ मोठ्या संख्येने उपस्थित होते.यावेळी अध्यक्ष ॲड. निलेश हेलोंडे पाटील म्हणाले की, गायरान जमिनीवर चारा लागवड करुन, शेतकरी कुटूंबांना दुग्ध व्यवसायाच्या माध्यमातून शाश्वत अर्थिक उत्पन्नासाठी प्रोत्साहन देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. अनेक कुटूंबाकडे चारा लागवडीसाठी स्वत:ची जमीन नसल्यामुळे शासनामार्फत गायरान जमिनीवर चारा लागवड करून त्यांना मदत करण्यात येत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांचा चाऱ्यासाठी होणाऱ्या खर्चाची बचत होणार आहे. पारंपरिक पद्धतींसोबतच आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केल्यास कमी जागेतही भरपूर उत्पादन घेता येते. यामुळे चारा टंचाईवर मात करता येईल. तसेच पशुधनाचे पोषण व्यवस्थित होईल तसेच रोजगार निर्मिती, कार्बन क्रेडिट निर्माण, जमिनीची सुपीकता वाढविणे यासारखे अनेक फायदे होणार आहेत. तसेच पाऊस कमी पडल्यास या क्षेत्रास पाण्याची व्यवस्था करण्यात यावी, अशा सूचना त्यांनी यावेळी दिल्या.यावेळी ड हेलोंडे यांनी ग्रामस्थांशी संवाद साधुन त्यांच्या समस्या जाणुन घेत. मिशनतर्फे राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची माहिती देवून, शेतकऱ्यांनी त्या योजनांचा लाभ घ्यावा, असे आवाहनही केले. त्यांनी विशेषतः सामुदायिक स्तरावर चारा लागवड, साठवणूक केंद्रांची उभारणी, जलसंधारणाच्या उपाययोजना व पाणी बचतीच्या आधुनिक तंत्रांचा अवलंब करण्याचे महत्व अधोरेखित केले. तसेच त्यांना चारा लागावडीकरीता प्रोत्साहित केले.

दिनांक २५.०८.२०२५ रोजी पानवाडी, ता. काटोल, जि. नागपूर येथे मृतक अरविंद मुरोदिया शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट



दिनांक २५.०८.२०२५ रोजी तहसिलदार काटोल, जि. नागपूर यांचे समवेत चारा लागवड संदर्भात चर्चा



दिनांक २५.०८.२०२५ रोजी भिष्णूर, ता. नरखेड, जि. नागपूर येथे मृतक नितीन गोविंदराव ढबाले शेतकरी आत्महत्या प्रकरणात कुटूंबियास भेट




दिनांक २५.०८.२०२५ रोजी तहसिलदार नरखेड, जि. नागपूर यांचे समवेत चारा लागवड संदर्भात चर्चा



**दिनांक २५.०८.२०२५ रोजी जलालखेडा, ता. नरखेड, जि. नागपूर येथे चारा लागवडीचे ठिकाणास भेट व पाहणी**







दिनांक २५.०८.२०२५ रोजी जलालखेडा, ता. नरखेड, जि. नागपूर येथे पशुसंवर्धन दवाखाना भेट व पाहणी



दिनांक २५.०८.२०२५ रोजी मा. ना. श्री. मकरंदजी पाटील साहेब, मंत्री मदत व पुनर्वसन यांना मिशनकडून करण्यात आलेल्या कामाबाबतची माहिती पुस्तिका देताना मा. अध्यक्ष महोदय



**दिनांक २६.०८.२०२५ रोजी प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल येथे कौशल्य विकास कार्यशाळा कार्यक्रमास उपस्थित**

# शेतकरी सुखी तर देश सुखी - अड निलेश हेलोंडे




**काटोल** ■ प्रशांत पवार

दिनांक २६/०८/२०२४ रोजी प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल येथे कै.वसंतराव नाईक शेती स्वावलंबी मिशन महाराष्ट्र राज्य, प्रादेशिक फळ संशोधन केंद्र काटोल, कृषी विभाग, आत्मा, सिट्रस इस्टेट डीवरवाडी काटोल यांच्या संयुक्त विद्यमाने शेतीपूरक उद्योगावर कौशल्य विकास कार्यशाळा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. सदर कार्यक्रमाचे उद्घाटक मा. अड. निलेश हेलोंडे पाटील (अध्यक्ष, (राज्यमंत्री दर्जा) कैलास वसंतराव नाईक शेती स्वावलंबन मिशन महाराष्ट्र राज्य अमरावती कार्यक्रमाचे अध्यक्ष डॉ. मेघा डहाळे उद्यानविद्यावेता प्रादेशिक फळ संशोधन केंद्र, काटोल कार्यक्रमाचे प्रमुख अतिथी रविंद्र मनोहरे जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी नागपूर), कीटकशास्त्रज्ञ मा.श्री प्रदीपजी दवणे, धार्मिक साहेब, वनस्पती रोग शास्त्रज्ञ बागडे मॅडम, तुळशीराम चौधरी उपविभागीय कृषी अधिकारी,काटोल, . गुणवंत डफरे संस्थापक व कृषितज्ज्ञ बळीराजा प्रगतशील शेतकरी ग्रुप काटोल), भिमराव कडू कृषिभूषण पुरस्कार प्राप्त शेतकरी तालुका कळमेश्वर पुरुषोत्तम धोटे (सदस्य जिल्हा नियोजन समिती महादेव नखाते प्रगतशील शेतकरी नरखेड, डॉ . कैलास कडू (प्रगतशील शेतकरी,काटोल), प्रशांत पवार पत्रकार तसेच विक्रम भवारी तालुका कृषी अधिकारी व कृषि विभाग चे सर्व अधिकारी व कर्मचारी व मोठ्या प्रमाणात शेतकरी उपस्थित होते. तसेच कार्यक्रमात चव्हाण साहेबांनी ड्रोनचे प्रात्यक्षिक करून त्यातून होणारे फायद्याचे बाबत माहिती दिली. रिधोरा , कचारी सावंगा मूर्ती काटोल सावळी लाडगाव तसेच नरखेड तालुक्यातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

दैनिक जनप्रभात

**दिनांक २९.०८.२०२५ रोजी मोवाड, ता. नरखेड, जि. नागपूर येथे क्रिडा दिवस निमित्य महात्मा फुले सभागृह येथे आयोजीत कार्यक्रमास उपस्थित**







Shot on Y50
AI Quad camera